**पंतप्रधानांचे G-7 आऊटरीच सत्राला संबोधन (17 जून 2025)**

18 जून 2025

पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी हे कनानास्किस येथे 7 शिखर परिषदेच्या आऊटरीच सत्रात सहभागी झाले. 'ऊर्जा सुरक्षा: बदलत्या जगात उपलब्धता आणि माफकतेच्या सुनिश्चितीसाठी वैविध्यकरण, तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा" या सत्रात त्यांनी संबोधित केले. पंतप्रधानांनी कॅनडाचे महामहिम पंतप्रधान श्री. मार्क कार्नी यांचे निमंत्रणाबद्दल आभार मानले. वाटचालीची 50 वर्षे पूर्ण केल्याबद्दल G- 7 चे अभिनंदन केले.

2. आपल्या संबोधनात, भविष्यातील पिढ्यांसाठी ऊर्जा सुरक्षा हे मोठं आव्हान असल्याची बाब पंतप्रधानांनी अधोरेखित केली. सर्वसमावेशक विकासासाठी भारताच्या वचनबद्धतेचा विस्तार करताना पंतप्रधानांनी उपलब्धता, सुलभता, परवडणारी क्षमता आणि स्वीकार्यता ही तत्त्वे आहेत ज्यामुळे भारताला ऊर्जा सुरक्षेसाठीच्या दृष्टीकोनाला आधार मिळाला आहे. भारत जगातील सर्वात वेगाने विस्तारणारी प्रमुख अर्थव्यवस्था असली तरीही वेळेपूर्वी पॅरिस वचनबद्धतेचा भारताने यशस्वीपणे पूर्तता केल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली. शाश्वत आणि हरित भविष्यासाठी भारताची कटिबद्धता मांडताना भारताने अनेक जागतिक पातळीवर पुढाकार हाती घेतल्याची बाब त्यांनी मांडली. ज्यामध्ये आंतरराष्ट्रीय सौर आघाडी, आपत्ती प्रतिरोधक पायाभूत सुविधा आघाडी , जागतिक जैव इंधन आघाडी , मिशन लाइफ (LiFE) आणि 'एक सूर्य, एक जग, एक ग्रिड' यांचा समावेश होतो. या पुढाकारांना आंतरराष्ट्रीय समुदायाने अधिक बळकटी देण्याचे आवाहन पंतप्रधानांनी केले.

3. जगभरातील विविध भागांतील अनिश्चितता आणि वादांचा फटका ग्लोबल साउथ मधील देशांना बसला असल्याचे पंतप्रधानांनी म्हटलं आहे. जागतिक व्यासपीठावर ग्लोबल साउथच्या आवाज पोहचविण्याची जबाबदारी भारताने घेतली असल्याचे पंतप्रधान म्हणाले. जर आंतरराष्ट्रीय समुदाय शाश्वत भविष्याबाबत गंभीर असेल तर ग्लोबल साऊथ मधील प्राधान्य आणि चिंता समजून घेणे जगासाठी महत्त्वाचे आहे असे त्यांनी नमूद केले. सुरक्षेच्या आव्हानांवर भर देताना दहशतवाद विरोधी लढाईला बळकटी देण्याचे आवाहन देशांना केले. भारताच्या दहशतवाद विरोधी लढाई साठी जागतिक समुदायाच्या पाठिंब्याबद्दल आभार मानताना, त्यांनी पहलगाम दहशतवादी हल्ला केवळ भारत विरोधी नसून संपूर्ण मानवतेच्या विरोधातील असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या आणि प्रोत्साहन देणाऱ्या देशांविरुद्ध कडक कारवाई करण्याचे आवाहन त्यांनी केले. दहशतवादाशी सामना करताना दुहेरी निकष असू नयेत तसेच दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्यांना कधीही पुरस्कृत केले जाऊ नये, असे त्यांनी पुढे नमूद केले. दहशतवाद हा मानवतेसाठी गंभीर धोका असल्याचे सांगून पंतप्रधानांनी आंतरराष्ट्रीय समुदायापुढे विचार करण्यासाठी काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले :

-जेव्हा लक्ष्य बनविले जाईल तेव्हाच देशांना दहशतवादाचा धोका समजणार आहे का?

-दहशतवादाचे गुन्हेगार आणि पीडित यांची बरोबरी कशी होऊ शकेल?

-जागतिक संस्था दहशतवादाच्या मूक दर्शक बनणार आहेत का?

4. तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ऊर्जा संबंधावर देखील पंतप्रधानांनी भाष्य केले. परंतु तंत्रज्ञानातच प्रामुख्याने ऊर्जेचा व्यापक वापर होतो आणि स्वच्छ आणि हरित उपक्रमांद्वारे ते शाश्वत कसे बनवायचे याची रणनीती आखणे महत्त्वाचे आहे हे लक्षात घेतले पाहिजे. तंत्रज्ञानाच्या प्रचारासाठी भारताच्या मानव-केंद्रित दृष्टिकोनाचे स्पष्टीकरण देताना त्यांनी नमूद केले, की प्रभावी होण्यासाठी कोणत्याही तंत्रज्ञानाने सामान्य लोकांच्या जीवनात स्थान मिळवले पाहिजे. तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्यासाठी भारताच्या मानव-केंद्रित दृष्टीकोनाविषयी सविस्तर माहिती देताना, ते म्हणाले की प्रभावी होणारे कोणतेही तंत्रज्ञान सामान्य लोकांच्या जीवनात मूल्य आणणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेशी निगडीत जागतिक प्रशासनाच्या समस्यांचे निराकरण करणे, कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे निर्माण होणाऱ्या चिंतांना तोंड देण्यासाठी आणि क्षेत्रातील नवोपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी महत्त्वाचे आहे,असे त्यांनी यावेळी सुचवले. एआयच्या युगात महत्त्वपूर्ण खनिजांच्या सुरक्षित आणि लवचिक पुरवठा साखळ्या असणे महत्त्वाचे आहे,असे त्यांनी अधोरेखित केले. पंतप्रधानांनी पुढे सांगितले की, भारतात विपुल प्रमाणात उपलब्ध असलेला दर्जेदार आणि वैविध्यपूर्ण डाटा जबाबदार कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी महत्त्वाचा आहे.

5. शाश्वत भविष्य साध्य करण्यासाठी आणि ते साध्य करण्यासाठी तंत्रज्ञानाच्या नेतृत्वाखालील जगात देशांमध्ये जवळच्या सहकार्याचे आवश्यक आहे, असे पंतप्रधानांनी भर दिला. नागरिक आणि हा ग्रह (पृथ्वी) यांना प्रगतीच्या केंद्रस्थानी ठेवले पाहिजे. या सत्रातील पंतप्रधानांचे भाषण पुढील लिंकवर पाहता येईल.[Link]

कनानास्किस

17 जून 2025